# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

## दिनांकः04.12.2024 वारःबुधवार

---

1. 21 हजार कोटी रुपयांच्या उपकरण खरेदी प्रस्तावाला नौदलाची मंजुरी
2. नौदल दिनानिमित्त आज विविध कार्यक्रमाचे आयोजन
3. बँकिंग कायदे सुधारणा विधेयकाला लोकसभेत मंजूरी
4. दक्षिण कोरियातील मार्शल लॉ काही तासांत मागे आणि
5. पुरुषांच्या हॉकी कनिष्ठ गट आशिया चषक स्पर्धेत भारतीय संघ अंतिम फेरीत दाखल

**नौदल**

नौदल संरक्षण सामग्री अद्ययावत करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने 21 हजार कोटी रुपयांच्या उपकरण खरेदी प्रस्तावाला काल मंजुरी दिली. संरक्षण अधिग्रहण परिषदेनं 21 हजार 772 कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या पाच भांडवली अधिग्रहण प्रस्तावांचा यात समावेश आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालील काल नवी दिल्ली इथं परिषदेची बैठक झाली, त्यावेळी ही मंजुरी देण्यात आली असल्याची माहिती संरक्षण मंत्रालयानं दिली आहे. यामध्ये पाण्यावरुन अतिजलद मारा करणाऱ्या 31 विमानांच्या खरेदीसाठी मंजूरी, कमी-तीव्रतेच्या सागरी मोहिमा, नौदलाच्या क्षेत्रात पाळत ठेवणे, गस्त आणि किनारपट्टीजवळ शोध आणि बचाव कार्यासाठी कामात मदत करणाऱ्या यंत्रणेचा समावेश आहे. याशिवाय, ही जहाजे चाचेगिरीविरोधी मोहिमांमध्ये, विशेषत: भारतीय बेटांच्या प्रदेशात आणि आसपास क्षेत्रात महत्वाची भूमिका बजावतील.

**नौदल दिवस**

आज नौदल दिवस आहे. देशाच्या सुरक्षेत नौदलाची भुमिका महत्वाची आहे. नौदलाच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. 1971 मध्ये ट्रायडंट अभियानादरम्यान पाकिस्तानच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देत चार पाणबुड्याना समुद्रात बुडवण्यात भारतीय नौदलाला यश आलं होतं यामध्ये शेकडो पाकिस्तानी नौदलाचे कर्मचारी मारले गेले होते. या विजयाची आठवण म्हणून नौदल दिवस साजरा केला जातो. यानिमित्त पुरी इथं ब्लू फ्लॅग बीचवर होणाऱ्या कार्यक्रमात राष्ट्रपती दौपदी मुर्मू प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहतील. नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के त्रिपाठी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसंच राष्ट्रपती आज सकाळी पुरीतील श्री जगन्नाथ मंदिराला भेट देतील आणि गोपबंधू आयुर्वेद महाविद्यालयाच्या 75 व्या वर्धापन दिन सोहळ्यातही सहभागी होतील.

**संसद**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनातले पहिले पाच दिवस विविध मुद्द्यांवरून झालेल्या गदारोळामुळे दोन्ही सभागृहांचं कामकाज झालं नव्हतं, पण काल सहाव्या दिवशी प्रश्नोत्तरांचा तास आणि शून्य प्रहरात सार्वजनिक हिताच्या अनेक मुद्यांवर चर्चा झाली. विरोधकांनी विविध मुद्यांवरून निदर्शनं करत सभात्याग केला; मात्र तरीही कामकाज सुरू राहिलं. लोकसभेत बँकिंग कायदे सुधारणा विधेयक 2024 मंजूर करण्यात आलं. या विधेयकानुसार वारसदारांची अर्थात नॉमिनीजची संख्या चारपर्यंत वाढवण्यात येणार आहे. या सुधारणांमुळे बँक प्रशासनात अधिक बळकटी येणार असल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितलं. राज्यसभेत तेलक्षेत्र नियमन आणि विकास सुधारणा विधेयक 2024 ला काल मंजुरी देण्यात आली. या विधेयकामुळे तेल आणि वायू क्षेत्रात व्यवसाय करणं सुलभ होईल, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी सांगितलं. शेतमालाच्या हमीभावात तिप्पट वाढ करण्यात आल्याचं केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं.

**संसद-प्रवेशद्वार**

सर्व खासदारांनी संसदेच्या प्रवेशद्वाराजवळ कोणतेही आंदोलन करु नये अशी विनंती लोकसभा सचिवालयानं सर्व संसद सदस्यांना केली आहे. अशा आंदोलनांमुळे अधिवेशनादरम्यान संसद सदस्यांच्या हालचालींवर मर्यादा येतात. संसद भवनातील सदस्यांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी इमारतीचे प्रवेशद्वार जाण्या-येण्यासाठी मोकळं ठेवणं आवश्यक आहे. या संदर्भात लोकसभा अध्यक्षांनी दिलेल्या निर्देशांचं सदस्यांनी पालन करावं असंही सचिवालयानं सुचवलं आहे.

**भाजपा-बैठक**

भारतीय जनता पक्षाच्या गटनेत्याची निवड करण्यासाठी नवनियुक्त आमदारांची आज मुंबईत बैठक होणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपानी निरिक्षक म्हणून या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. नव्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी उद्या मुंबईतील आझाद मैदान इथं संध्याकाळी 5 वाजता पार पडेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, अन्य केंद्रीय मंत्री तसंच रालोआ शासित राज्यांचे मुख्यमंत्री या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

**राष्ट्रपती पुरस्कार**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते काल नवी दिल्लीत राष्ट्रीय दिव्यांगजन सक्षमीकरण पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं. जागतिक दिव्यांग दिनानिमित्त, या समारंभात, दिव्यांग सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या 22 व्यक्ती आणि 11 संस्थांना सन्मानित करण्यात आलं. या सन्मान सोहोळ्यातून आणखी काही व्यक्ती आणि संस्थांना दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी काम करण्याची प्रेरणा मिळेल असा विश्वास राष्ट्रपतींनी यावेळी व्यक्त केला. सुगम्य भारत अभियानामुळे दिव्यांग व्यक्तींना कुठेही जाणं सुलभ झालं आहे. दिव्यांगांना दयेची नाही तर सहानुभूतीची गरज आहे, कोणावर अवलंबून न राहता आपणही स्वतंत्ररित्या वावरू शकतो याची जाणीव त्यांना करुन देण्यासाठी सर्व समाजानं प्रयत्न करणं गरजेचं आहे असं राष्ट्रपती म्हणाल्या. या कार्यक्रमात श्रवणदोष असलेल्या मुलांच्या शिक्षिका प्रियंका दीपक दबडे आणि प्रथमेश सिन्हा हा विद्यार्थी या पुण्यातल्या दोघांचा तसंच कनिका अग्रवाल यांचा सन्मान करण्यात आला. दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी काम करणारी सर्वोत्कृष्ट संस्था या श्रेणीत मुंबईतल्या सेंट झेवियर्स कॉलेजच्या झेवियर्स रिसोर्स सेंटर फॉर द व्हिज्युअली चॅलेंज्ड या संस्थेचा सन्मान करण्यात आला.

**दिव्यांग-उपक्रम**

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त, नवी दिल्लीत काल झालेल्या कार्यक्रमात, केंद्र सरकारतर्फे दिव्यांग सक्षमीकरणासाठी सरकारने सोळा उपक्रम सुरू करण्यात आले. या उपक्रमांच्या माध्यमातून, प्रत्येक दिव्यांगजनासाठी समान संधी, सुलभता आणि सक्षमीकरण सुनिश्चित करण्याचे सरकारचे उद्दिष्ट असल्याचं प्रतिपादन सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉक्टर विरेन्द्र कुमार यांनी केलं. केंद्र सरकार दिव्यांगांचे हक्क आणि सन्मान राखण्यासाठी कटिबद्ध असून, या उपक्रमांच्या माध्यमातून सर्वसमावेशक आणि सौहार्दपूर्ण समाज निर्माण करण्याच्या दिशेने पाऊल उचललं असल्याचं ते पुढे म्हणाले. या उपक्रमांमधे 'कदम नी जॉईंट', सुगम्य भारत अभियान आणि ब्रेल बुक पोर्टल आदि उपक्रमांचा समावेश आहे.

**दक्षिण कोरिया**

दक्षिण कोरियातील नॅशनल असेंब्लीनं मार्शल लॉ संपविण्याच्या बाजूने मतदान केल्यानंतर, तसंच राजकीय क्षेत्रांमधील प्रतिनिधींनी नोंदवलेल्या तीव्र प्रतिक्रियांनंतर दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष यून सुक येओल यांनी मार्शल लॉ उठवण्याची घोषणा केली आहे. त्यांच्या मंत्रिमंडळाने मार्शल लॉ जाहीर केल्यानंतर सहा तासांनी लष्करी कायदा संपुष्टात आणण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली. मार्शल लॉ लागू करण्यासाठी एकत्रित केलेले सैन्य कर्मचारी आपापल्या तळांवर परतले आहेत. असं दक्षिण कोरियाचे जॉइंट चीफ्स ऑफ स्टाफने यांनी स्पष्ट केलं आहे.

**क्वांटम**

क्वांटम तंत्रज्ञानाचा विकास करण्याच्या उद्देशानं भारतातील उद्योगांशी इस्त्रायलमधील स्टार्टअप्सनी भागीदारी करावी यासाठी भारतानं पुढाकार घेतला आहे. इस्त्रायलचे उद्योग आणि आर्थिक विभागाचे मंत्री नीर बरकत सध्या भारताच्या दौऱ्यावर असून काल त्यांनी विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंग यांची भेट घेतली. बैठकीत, स्टार्टअपमधील सहकार्य,

तसंच अंतराळ आणि क्वांटम तंत्रज्ञान, कृषी आणि आरोग्य क्षेत्रातील नावीन्यपूर्ण उपक्रमांसंदर्भातील सहकार्य वाढवण्यावर भर देण्यात आला. तसंच सेमीकंडक्टर्स, कृत्रिम बुध्दीमत्ता, मोबाईल उत्पादन तसंच 5जी तंत्रज्ञान आदी मुद्यांवर यावेळी चर्चा झाली.

**<u>इस्त्रो</u>**

भारतीय अवकाश संशोधन संस्था अर्थात इस्त्रो श्रीहरीकोटी इथल्या सतिश धवन अंतराळ केंद्रातून आज संध्याकाळी चार वाजून 8 मिनीटांनी युरोपियन स्पेस एजन्सीचे प्रोबा 3 उपग्रह PSLV C59 द्वारे सुर्याच्या दीर्घवृत्तीय कक्षेत प्रक्षेपित करणार आहे. इस्त्रोची व्यावसायिक शाखा असलेल्या न्यू स्पेस इंडिया लिमिटेडला युरोपियन स्पेस एजन्सीकडून मिळालेल्या कामाचा हा भाग आहे. प्रोबा 3 उपग्रह कक्षेत पोहोचल्यानंतर त्याचे दोन भाग होतील. हे उपग्रह सूर्याचा गाभा, त्याच्या सभोवतालचे वातावरण, अवकाशातील हवामान आणि सौर वारा यांचा अभ्यास करतील.

**<u>बांग्लादेश</u>**

बांग्लादेशमध्ये दहशतवादी हल्ला होण्याची शक्यता ब्रिटननं व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर बांग्लादेशमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पर्यटक भेट देत असलेली ठिकाणं, गर्दीची ठिकाणं, सांस्कृतिक ठिकाणं आणि राजकीय सभांच्या ठिकाणी हल्ला होण्याची शक्यता ब्रिटनच्या फॉरेन कॉमनवेल्थ आणि डेव्हलमेंट ऑफिसनं वर्तवली आहे.

**<u>हॉकी</u>**

ओमान मधील मस्कत इथे सुरू असलेल्या पुरुषांच्या कनिष्ठ आशिया चषक स्पर्धेच्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात भारतीय संघाने मलेशिया संघाचा 3-1 असा पराभव करत, स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. भारतातर्फे दिलराज सिंह, रोहित आणि शारदानंद तिवारी यांनी गोल करत संघाला अंतिम फेरीत स्थान मिळवून दिलं. आज होणाऱ्या अंतिम सामन्यात भारताची लढत कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तान संघाशी होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार.